दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१३ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५१ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 13 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 251 | Pages 4 | Rate 4 Rs

### सुनील तटकरेंनी घेतली शरद पवारांची भेट

**मुंबई**–राज्याच्या राजकीय वर्तुळातून एक अत्यंत मोठी आणि खळबळजनक बातमी समोर येत असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांची त्यांच्या सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट घेतली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर या दोन्ही नेत्यांमधील ही पहिलीच भेट असल्याचे सांगितले जात असून, यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत तटकरे यांचे नाव नसल्याच्या चर्चा आणि राष्ट्रवादीच्या संभाव्य विलिनीकरणाला सुनील तटकरे व प्रफुल पटेल यांचा विरोध असल्याच्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर या भेटीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नुकत्याच घडलेल्या नाट्यमय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या दोन नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# राज्यातील मंत्र्यांच्या विमान प्रवासाला 'ब्रेक' : मुख्यमंत्र्यांची मंजुरी अनिवार्य

## पंतप्रधान मोदींच्या आवाहनानंतर सरकारचा मोठा निर्णय

### मोदींच्या आवाहनानंतर मंत्री आशिष शेलार यांचेही तीन निर्णय

दरम्यान, पंतप्रधानांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आपल्या विभागासाठी तीन महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. जागतिक चित्रपट महोत्सवासाठी (Cannes) विभागाकडून कोणाही प्रतिनिधीने जाऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. विभागाच्या कामकाजासाठी इंधनावरील वाहने टाळून केवळ इलेक्ट्रिक वाहनांचा (EV) वापर केला जाईल. उद्यापासून माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक विभागाच्या सर्व बैठका प्रत्यक्ष न होता ऑनलाइन स्वरूपात पार पडतील, जेणेकरून प्रवासावरील इंधन खर्च वाचवता येईल, असे निर्णय मंत्री आशिष शेलार यांनी घेतले आहेत.

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला इंधन बचतीसाठी काटकसर करण्याचे आवाहन केल्यानंतर, महाराष्ट्र सरकारने त्याची कडक अंमलबजावणी सुरू केली आहे. आता राज्यातील मंत्र्यांना सरकारी विमानाचा वापर करण्यासाठी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लेखी मंजुरी घ्यावी लागणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही मंत्र्याला विमान वापरता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, याचे सावट आता भारतावरही दिसू लागले आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत राज्य सरकारने उपरोक्त निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.



या निर्णयाबाबत माहिती देताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, एखाद्यावेळी तातडीने कुठे जायचं असेल तर मी विमान वापरतो. माझ्या वर्षभरात चार-पाच वेळा तातडीचे काम असते तेव्हाच विमानाने जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खूप व्यस्त असतात, म्हणून ते विमान वापरतात. आता मुख्यमंत्र्यांच्या मंजूरी शिवाय मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच माझ्या जास्तीत जास्त बैठका ऑनलाइन असतात. मी जिल्हाधिकारी, अधिकाऱ्यांना बोलवत नाही. मी ऑनलाइन बैठका घेऊन तोडगा काढतो.

### मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर नीतेश राणेंच्या विभागाला सूचना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांनीही आपापल्या विभागात बदलांचे वारे सुरू केले आहेत. मंत्री नीतेश राणे यांनी मत्स्य विकास व बंदर विभागाला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. या विभागाच्या सर्व बैठका आता प्रत्यक्ष न घेता ऑनलाइन पद्धतीने घेतल्या जातील. यामुळे अधिकाऱ्यांचा प्रवास खर्च आणि वेळेची बचत होणार आहे.केवळ बैठकाच नाही, तर वाहतुकीच्या साधनांमध्येही बदल करण्याचे आदेश नीतेश राणे यांनी दिले आहेत. विभागातील अधिकाऱ्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या गाड्यांऐवजी आता इलेक्ट्रिक वाहनांचा (EV) वापर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. यामुळे इंधनावरील खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक कामकाजाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे यांची नियुक्ती

### महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी दिली पद आणि गोपनीयतेची शपथ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

सामान्य प्रशासन विभागाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेनुसार अरुण किशोर डोंगरे यांची अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी डोंगरे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.


नवीन प्रशासन भवन, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात झालेल्या शपथग्रहण सोहळ्यामध्ये माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली.



अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल नवनियुक्त आयुक्त अरुण डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले.या शपथविधी सोहळ्याला विधानसभा सदस्य करण देवतळे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, कोकण विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त सुधाकर तेलंग तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण आज हटविण्यात येणार





दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दि.२२एप्रिल २०२६रोजी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत व केज, अंबाजोगाई येथील सर्व शासकीयअधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अतिक्रमण हटवीण्यासाठी मंजुरी देण्यात आली होती.त्या प्रमाणे शासकीय जागेवर अतिक्रमण करणाऱ्या अतिक्रमण धारकांना मुंबई महामार्ग १९५५ च्या कलम २३ प्रमाणे अतिक्रमण काढून घेण्याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. परंतु यादरम्यान कोणीही अतिक्रमण हटविले नाही त्यामुळे शासकीय जागे वरील अतिक्रमण हटविण्याताना शांतता व सुव्यवस्था राखली जावी छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा चे कार्यकारी अभियंता यांनी बीड येथील पोलीस अधीक्षक यांच्याकडे पोलीस बंदोबस्ताची मागणी केली होती.त्या प्रमाणे विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी अतिक्रमण हटविण्यासाठी पोलीस बंदोबस्त दिलेला आहे. त्यामुळे बुधवार,गुरुवार, आणि शुक्रवार या तीन दिवस केज येथील शासकीय जागेवरील राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने ५० फुटा वर असलेले शासकीय जागेतील जे अतिक्रमण असेल ते उठवण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार अशोक भंडारे यांनी दिली आहे.

# राज्य विमा योजनेच्या रुग्णालयांमधील आरोग्य सुविधांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवा-कामगार मंत्री आकाश फुंडकर यांचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

राज्यातील प्रत्येक कामगाराला त्याच्या हक्काच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात.यासाठी 'कर्मचारी राज्यातील सर्व विमा योजनेच्या रुग्णालयांमधील वैद्यकीय सुविधांचा लाभ शेवटच्या कामगारापर्यंत पोहचविण्यात यावा, असे निर्देश कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले आहेत. आज या राज्यातील विमाधारक कामगारांची वाढती संख्या लक्षात घेता, आरोग्य सुविधांचा विस्तार आणि जनजागृतीवर करण्याच्या सूचनाही मंत्री श्री फुंडकर यांनी दिल्या.

बैठकीस सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर , कामगार आयुक्त एच. पी तुम्मोड, कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या प्रादेशिक संचालक अभिलाषा झा , उपसचिव रोशनी कदम, भारतीय मजूर संघाचे अनिल डोमणे आदी उपस्थित होते.

बैठकीत कामगार मंत्री म्हणाले, केंद्रीय कामगार विभागाच्या माध्यमातून राज्यात कर्मचारी राज्य विमा योजनेतंर्गत १८ नवीन रुग्णालयांना मंजुरी देण्यात आली आहे. या रुग्णालयांमुळे कामगारांना त्यांच्या निवासस्थानाजवळ किंवा कामाच्या ठिकाणी तातडीने उपचार मिळणे सुलभ होणार आहे. तसेच आरोग्य शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढवण्यासाठी अंधेरी (मुंबई), पुणे आणि नागपूर येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. ही महाविद्यालये आणि रुग्णालये कामगारांसाठी आरोग्य सुविधेचा मोठा आधार ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.केवळ सुविधा निर्माण करून चालणार नाही, तर त्याची माहिती कामगारांपर्यंत



पोहोचणे ही काळाची गरज असल्याचे सांगत कामगार मंत्री म्हणाले, प्रत्येक विमाधारक कामगाराच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर जवळच्या रुग्णालयाची माहिती, उपलब्ध सुविधा याची माहिती पाठवावी. याद्वारे कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती निर्माण होईल. तसेच आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीत त्यांच्यासाठी असलेल्या रुग्णालयांची मदत त्यांना होईल. सध्या राज्यात साधारण ४९ लाख विमाधारक कामगार आहेत. मात्र, केंद्र सरकारच्या नवीन कामगार कायद्याची अंमलबजावणीनंतर या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. वाढणाऱ्या या कामगार वर्गाला दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी यंत्रणेने आतापासूनच सज्ज व्हावे, असे आवाहनही कामगार मंत्र्यांनी केले. कामगारांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही आणि मंजूर झालेली रुग्णालये लवकरात लवकर कार्यान्वित करण्याला प्राधान्य दिले जाईल, असेही ड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला कामगार विभागाचे वरिष्ठ सचिव, विमा योजनेचे आयुक्त आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# संपादकीय

## आवाहन आणि आव्हान



कथित अण्वस्त्रसज्ज इराणला धडा शिकवण्यासाठी इस्रायलने अमेरिकेच्या पाठिंब्याने त्या देशावर हल्ला चढवला तो २८ फेब्रुवारी रोजी. तिकडे आखातात ती धुमश्चक्री सुरू असताना इकडे, आपल्याकडील पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुका पार पडून त्यांचा निकाल लागला तो गेल्या आठवड्यात, ४ मे रोजी. आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखाती युद्धाच्या आपल्या देशाला सोसाव्या लागत असलेल्या झळांची तीव्रता कमी करण्यासाठी काटकसरीच्या विविध उपायांचे आवाहन केले ते परवा, १० मे रोजी. म्हणजे युद्धाला तोंड फुटून तीन महिने उलटून गेल्यानंतर पंतप्रधानांचे हे जाहीर आवाहन आलेले आहे.खरे म्हणजे असे आवाहन पंतप्रधानांनी याआधीच करणे अपेक्षित होते; पण दरम्यानचा काळ पडला पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचा. त्या काळात असे काही काटकसरीचे आव्हान करणे म्हणजे 'सरकार कुचकामी आहे; सगळे ओझे नागरिकांच्या खांद्यावर ठेवते आहे,' असा आरोप विरोधकांना करण्याची संधी देणे, असे सरकारला वाटले असावे. त्यामुळे, निवडणुका उरकू देत; मग आवाहन करू या, हा सरकारचा आणि अर्थातच भारतीय जनता पक्षाचा हिशेब असणारच. त्यास अनुसरून पंतप्रधानांचे हे आवाहन विलंबाने आलेले दिसते.क्षीण होणारा भारतीय रुपया, कच्च्या तेलाचे आकाशाला भिडलेले भाव, इंधन टंचाईचे संकट, तेल कंपन्यांना रोज होत असलेला सुमारे १६०० ते १७०० कोटी रुपयांचा तोटा, सोनेआयातीसाठी खर्च करावे लागणारे डॉलर आदी मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांपुढील मर्यादित पर्यायांकडे बघता येईल. शक्य तेथे 'वर्क फ्रॉम होम' करा, वर्षभर सोनेखरेदी टाळा, वर्षभर परदेश प्रवास टाळा, इंधन वाचवा, खाद्यतेल कमी वापरा, परदेशी वस्तूखरेदी कमी करा, एक वर्ष परदेशात जाऊ नका, आयात खते वापरू नका... ही पंतप्रधानांच्या आवाहनांची गोळाबेरीज. या सगळ्याच्या मुळाशी आहे ते भारतातील परकी चलनाची गंगाजळी राखण्याचे उद्दिष्ट. युद्ध सुरू होण्याच्या सुमारास ही गंगाजळी ७२८ अब्ज डॉलर होती, ती युद्धाच्या झळांमुळे ६९०.६९ अब्ज डॉलरपर्यंत घसरलेली आहे.आपल्या एकूण निर्यातीत कच्चे तेल, सोने, खाद्यतेल आणि परदेशी खते या चार घटकांच्या मिळून आयातीचे प्रमाण जवळपास ३१ टक्के इतके आहे. ही आयात घटल्यास देशाची परकी गंगाजळी चांगल्या प्रमाणात वाचू शकते, हे गणित पंतप्रधानांच्या आवाहनामागे आहे. त्याच वेळी, भारताची चालू खात्यातील तूट (सीएडी) ४८४.५ अब्ज डॉलरवर जाण्याचा इशारा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेला आहे. या सगळ्या बाबी लक्षात घेता आणि आखातातील धुमश्चक्री थांबण्याबाबतची अनिश्चितता पाहता काही उपाय करणे आवश्यकच आहे, यात शंका नाही. प्रश्न असा आहे की, या अशा आवाहनांनी खरोखर काही साध्य होईल का? आणि निवडणुकांमुळे दीर्घ काळ रोखून धरलेली इंधनदरवाढ करण्यासाठीची ही नेपथ्यरचना तर नाही ना?पंतप्रधान मोदी यांनी सध्याच्या काळाला 'संकटकाळ' असे संबोधलेले असले तरी त्यास सामोरे जाण्यासाठीच्या उपायांबाबत नियमांचे सूतोवाच अद्याप तरी केलेले नाही. आणि या अशा गोष्टी केवळ आवाहन करून होतील, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. हे संकटकालीन आव्हान स्वीकारायचे तर मुळात आधी आपल्यापुढ्यात समस्या आहेत, हे खुल्या मनाने कबूल करावे लागेल. ही अशी कबुली देण्यास सरकार आजवर चाचरत का होते ते नकळे. आणि महत्त्वाचे म्हणजे सोनेखरेदी, खाद्यतेल, इंधन वापर, खतांचा वापर या गोष्टी भारतीयांच्या भल्या-बुऱ्या मानसिकतेशी निगडित आहेत.कुणी आवाहन करून, सूचना करून त्या मानसिकतेत एकाएकी, एका रात्रीत बदल होणे खूपच कठीण. त्यामुळे हे आव्हान स्वीकारण्यासाठी ठोस पावलेच टाकावी लागतील. ती करताना विविध घटकांचा विचार करावा लागेल. मोदी यांच्या आवाहनानंतर दुसऱ्याच दिवशी, सोमवारी शेअर बाजारात काही कंपन्यांच्या शेअर्सना फटका बसला. आणि विचार फक्त शेअर बाजाराचा व्हायला नको; सोने, शेती, वाहतूक अशा उद्योगांतील शेवटच्या माणसाचा विचार करून नियम करावे लागतील. हे आव्हान मोदी सरकारने स्वीकारावे.

# चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर तत्काळ तोडगा काढा

### एका महिन्यात अंमलबजावणी अहवाल सादर करण्याचे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

मुंबईतील गोरेगाव येथील चित्रनगरीसह राज्यातील चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनिअर कलाकारांच्या विविध प्रश्नांबाबत आज विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.कंत्राटी कामगार व ज्युनिअर कलाकारांच्या कामाचे तास निश्चित करावेत,सकस भोजनाची व्यवस्था, वेतन थेट निर्मात्यांकडून देणे, चित्रीकरण स्थळी स्वच्छता राखणे, महिला कलाकारांसाठी स्वतंत्र कपडे बदलण्याची सुविधा तसेच रात्रीच्या चित्रीकरणानंतर सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे या प्रमुख मागण्यांवर चर्चा करण्यात आली.



गेल्या हिवाळी अधिवेशन २०२५ दरम्यान औचित्याच्या मुद्द्याद्वारे चित्रपट व करमणूक क्षेत्रातील कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांवर होत असलेल्या अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला होता. यावर प्रशासनाने कार्यवाही न केल्याने आमदार सुनील प्रभू यांनी नाराजी व्यक्त केली.

शासनाच्या मानक कार्यप्रणालीची अंमलबजावणी करण्याबाबत चित्रनगरी प्रशासनाने संबंधित निर्मिती संस्थांना यापूर्वी सूचना देऊनही अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याबाबत यावेळी चिंता व्यक्त करण्यात आली.कंत्राटी फिल्म कामगार आणि ज्युनियर कलाकारांच्या प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संयुक्त समितीची बैठक घेण्याच्या सूचना यावेळी उपाध्यक्षांनी दिल्या. तसेच, करण्यात आलेल्या उपाययोजनांचा सविस्तर अंमलबजावणी अहवाल एका महिन्याच्या आत सादर करण्याचे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले आहेत.राज्यातील सुमारे ५ लाख कंत्राटी फिल्म कामगार व ज्युनिअर कलाकारांच्या हितासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिले.

या बैठकीत आमदार सुनील प्रभू,फिल्म सिटी च्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, फिल्मसिटी चे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे उप सचिव महेश वाव्हळ तसेच विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# मोदींच्या काळात कामगारांची अवस्था बिकट:सरकारला कामगारांची मेहनत नव्हे फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात-विजय वडेट्टीवार



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात कामगारांची अवस्था बिकट झाली आहे. सध्या देशातील जवळपास २५ टक्के कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. देश चालवणाऱ्यांना कामगारांची मेहनत दिसत नाही, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली.एसबीआयचा पीएलएफएस २०२५ अहवाल नुकताच जारी झाला. विजय वडेट्टीवार यांनी या अहवालाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, सबका साथ, सबका विकास म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळात कामगारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया च्या झडत्रड २०२५ अहवालानुसार देशातील जवळपास २५% कंत्राटी कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. महिलांची अवस्था तर आणखी वाईट आहे. देश चालवणाऱ्यांना मात्र कामगारांची मेहनत दिसत नाहीत, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात. नवीन Labour Codes च्या नावाखाली भाजप सरकारने कामगारांचे हक्कच कमजोर केले आहेत. संप करायचा असेल तर ६० दिवस आधी नोटीस द्या, तक्रार प्रलंबित असेल तर संप बेकायदेशीर ठरेल, सुरक्षा नियम मोडले तरी पैसे भरून सुटका मिळेल. म्हणजे कामगारांनी फक्त काम करत राहायचं, प्रश्न विचारायचे नाहीत, हक्क मागायचे नाहीत. Ease of Doing Businessच्या नावाखाली Hardship of Living सामान्य जनतेच्या माथी मारलं जात आहे.भाजपची अर्थनीती आता स्पष्ट दिसते आहे. गरीबांची मेहनत स्वस्त करा, कामगारांचा आवाज दाबा आणि उद्योगपती मित्रांसाठी रेड कार्पेट अंथरा. पण लक्षात ठेवा, मजुरांच्या हाडांवर उभे केलेले महाल जास्त काळ टिकत नाहीत, असे ते म्हणाले.विजय वडेट्टीवार यांनी यावेळी पंतप्रधानांनी जनतेला केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचाही खरपूस समाचार घेतला. तसेच २००८ च्या भयंकर जागतिक महामंदीचा काँग्रेसच्या कुशल नेतृत्वामुळे देशाला कोणताही फटका बसला नसल्याचाही दावा केला. ते म्हणाले, २००८ च्या महाभयंकर जागतिक मंदीतही ज्या देशाचं सुकाणू हललं नाही, मंदीचे चटके बसत असतानाही आपला देश सुरक्षित राहिला. तिथे आज महासत्तेच्या नावाखाली जनतेलाच त्याग करायला सांगितलं जातंय! २०१४ मध्ये अच्छे दिनचे स्वप्न दाखवून सत्तेत आलेले आज सांगतात पेट्रोल, डिझेल वापरू नका, सोनं घेऊ नका, खाद्यतेल कमी करा!साहेब, देशाला बर्बाद करायचं कार्यक्रम तुम्ही करायचा आणि जबाबदारी मात्र जनतेने घ्यायची? पाच राज्याच्या निवडणुका होईपर्यंत युद्धाचा विसर पडला होता, आता निवडणुका संपल्या की लगेच 'त्याग' आठवला? सल्ले द्यायला फक्त पंतप्रधान, आणि भोगायला मात्र सामान्य जनता! वाह मोदीजी वाह, असे ते म्हणालेत.

# एमडी ड्रग तयार करण्यासाठीची रसायने व लॅबचे साहीत्य गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून जप्त.

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता रुम नंबर २०२ छेडा आदर्श बिल्डींग, बैंक रोड, नयानगर, मिरारोड पुर्व जि. ठाणे येथे महिला नामे श्रीमती. फिरदोस अरबाज कुरेशी हिचे घरातुन एकुण १ किलो ३२४ ग्रॅम वजनाचा एकुण २,६६,१७,२८० रुपये किंमतीचा एम.डी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन सदरचा अंमली पदार्थ हा तिचा पती नामे अरबाज वकील कुरेशी याचा असल्याने आरोपीत नामे-श्रीमती. फिरदोस अरबाज कुरेशी व आरोपीत नामे अरबाज वकील कुरेशी यांचे विरुध्द नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १०२/२०२६ गुंगीकारक औषधीद्रव्ये आणि मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधि. १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २२ (क), २९, प्रमाणे दिनांक ०४/०४/२०२६ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे.सदर गुन्हयाचा सखोल तपास करण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष ४, कडे वर्ग करण्यात आला असता सदर गुन्हयात अद्याप पावेतो ०२ महिला आरोपी व ११ पुरुष आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयात एकुण ६ किलो ७७३ ग्रॅम वजनाचा एम.डी. ड्रग जप्त करण्यात आले असुन गुन्हयातील अटक आरोपी क्रमांक १२ व १३ यांचेकडुन



एम.डी. ड्रग तयार करण्यासाठी लागणारे २५५ लिटर रसायन त्यात Sodium Hydroxide Pellets, Hydrochloric Acid, Acetone, Dichloromethane, Methylamine, Chloroform, व हिटींग ड्रायर, सेप्रेशन फ्लास्क, हिटींग मॅन्टल रिकव्हरी फ्लास्क, फोर फिंगर क्लॅम्प, ॲडीशन पॉट, बुकनर फनेल इत्यादी सामग्री सामना नगर मागील लग्न मैदान व आजमी नगर, मालवणी, मुंबई तसेच मौजे मनोरी, गोराई मुंबई. येथे जप्त करण्यात आला असुन अद्याप पावेतो एकुण १३.६५.४५,०९५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष -४ मार्फतीने सुरु आहे

# मान्सूनपूर्व तयारीचा ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला सविस्तर आढावा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्यात जिल्ह्यात कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी आतापासूनच सतर्क राहून समन्वयाने पूर्वतयारी करावी. जिल्ह्याचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा चोख असावा आणि आपत्कालीन स्थितीत तत्काळ मदतीसाठी 'आपदा मित्रां'ची संख्या वाढवावी, असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठक २०२६' समिती सभागृहात संपन्न झाली, त्याप्रसंगी ते बोलत होते.या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यावेळी बोलताना ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील सर्व धोकादायक पूल, साकव आणि जुन्या इमारतींचे ऑडिट करावे. जलसंपदा विभागाने धरणांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक अहवाल सादर करावा. राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्सून काळात दरडी कोसळण्याच्या घटना लक्षात घेऊन प्रमुख घाटांमध्ये जेसीबी, पोकलेन आणि डंपरची कायमस्वरूपी व्यवस्था करावी.

डॉ.पांचाळ यांनी आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणांची गतिशीलता तपासण्यासाठी अग्निशमन दल, पोलीस आणि आरोग्य विभागाने प्रत्येक तालुक्यात रंगीत तालीम घ्यावी. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभागाने औषध साठा आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवावीत अशा सूचना देवून आपत्ती निवारणासाठी आवश्यक साधनसामुग्रीसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून अनुदान उपलब्ध करून दिले जाईल,असे स्पष्ट केले.

# दहिवलीत वयोवृद्ध व्यक्तींचे घर हडपण्याचा प्रयत्न प्रशासनाकडे तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहिवली येथील कोकणआळी येथील रहिवासी नंदू अनंत रामाणे यांचे वडीलोपर्जित राहते जुने घर आहे.मात्र या जुन्या घरांची पडझड झालेली असून पुर्णपणे मोडकळीस आलेले आहे घराचे छप्पर नादुरुस्त झाल्याने पावसाळ्यात घर कोसळून जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे घराची डागडुजी करणेसाठी वयोवृद्ध नंदू अनंत रामाणे यांची एकुलती एक मुलगी वृषाली शिंदे हिने तातडीने कर्जत नगरपरिषदेत एक परवानगी अर्ज दाखल करून परवानगी घेतली होती.सदर घराला एकूण एकूण चार खोल्या असून एका मोठ्या खोलीला पार्टिशन टाकून एक लहान खोलीत राहतात तर उर्वरित तीन खोल्यांमध्ये नंदू रामाणे यांचे भाऊ कै.सुरेश अनंता रामाणे यांचा मोठा परिवारच राहत आहे

सदरचे घर नंदू रामाणे यांची आई कै.सुभद्रा अनंत रामाणे हिच्या नावे असुन घराची कोणतीही वाटणी किंवा वारसांची नोंद आजपर्यंत झालेली नाही त्यामुळे दहिवली कोकण आळीतील नंदु रामाणे यांनी राहत असलेल्या घर जुना मालमत्ता क्र २८१/०१ नवीन मालमत्ता क्र न२०००३०० व जुना मालमत्ता क्र.२८१/०२ नवीन मालमत्ता क्र.न२०००२९९ या मालमत्ते मध्ये कुठल्याही प्रकारचे बांधकाम करण्यास परवानगी देण्यात येऊ नये अशा स्वरूपाचे पत्र कर्जत नगरपरिषदेला दिनांक २९/०७/२०२४ रोजी देण्यात आले




आहे.मात्र नंदू रामाणे यांचे भाऊ कै सुरेश अनंत रामाणे यांची पत्नी सुवर्णा सुरेश रामाने,रितीका राकेश रामाणे, रुपेश सुरेश रामाने,मनिषा रमेश अहिरराव, वैशाली रत्नाकर जाधव , माधुरी शेखर म्हापार्ले, सोनाली संतोष व्यापारी असे मुलगा, मुली आणि जावई एकत्र कुटुंबात राहतात. ते सर्व मिळून त्याचे घरावर कब्जा करण्याच्या उद्देशाने त्रास देत आहे.तसेच घराच्या मोडकळीस आलेल्या घराची दुरुस्ती करणेसाठी गेले असताना कामाच्या ठिकाणी अडथळा निर्माण करून त्यांना व त्यांची मुलगी वृषाली हिला शिवीगाळ दमदाटी करून भांडणे करतात त्यामुळे त्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे.याबाबत त्यानी कर्जत पोलिस ठाणे व कर्जत नगरपरिषद यांच्याकडे लेखी तक्रारी अर्ज दाखल केलेले आहे तरी प्रशासनाने आम्हाला लवकरात लवकर योग्य न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे.

# बेलगावात पाणी प्रश्न पेटला; महिलेचा शोले स्टाईल आंदोलनाचा पवित्रा

## मनसेच्या घागर मोर्चाने प्रशासन हादरले; उपविभागीय अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासन

दैनिक वादळ वार्ता
**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील बेलगाव येथे गेल्या काही वर्षांपासून भीषण होत चाललेल्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर अखेर ग्रामस्थांचा संताप उफाळून आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पुढाकाराने महिलांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर घागर मोर्चा काढत जोरदार आंदोलन छेडले. आंदोलनादरम्यान कुसुम देवानंद वैद्य या महिलेने तहसील कार्यालय परिसरातील टॉवरवर चढून शोले स्टाईल आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे, मनसे वाहतूक सेना तालुका अध्यक्ष बाळू गेडाम व शहर उपाध्यक्ष संदीप धानोरकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी कार्यालयात आंदोलक महिला व मनसे पदाधिकाऱ्यांची चर्चा सुरू असतानाच कुसुम वैद्य या अचानक टॉवरवर चढल्या. तब्बल एक तास त्या टॉवरवर ठाण मांडून बसल्याने प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली.








बेलगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या सनफ्लॅग कोल अँड आयर्न कंपनीच्या भूमिगत कोळसा खाणीमुळे परिसरातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. परिणामी गावातील विहिरी, हातपंप व बोरवेल कोरड्या पडल्या असून नवीन बोरिंग करूनही पाणी लागत नसल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. कंपनीने उपलब्ध करून दिलेला आरओ प्लांटदेखील बंद असल्याने गावात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे महिलांना पाण्यासाठी अनेक किलोमीटर वणवण भटकावे लागत आहे.दरम्यान, गावातील काही लोकप्रतिनिधी व राजकीय पुढारी प्रश्न सोडविण्याऐवजी स्वतःचा स्वार्थ साधत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे संतप्त महिलांनी मनसेच्या नेतृत्वात एल्गार पुकारत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली.मागील ८ मे रोजी मनसेच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. सोमवारपर्यंत कंपनी व्यवस्थापनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला होता. यानंतर आंदोलनाची तीव्रता वाढताच उपविभागीय अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन देण्याची तयारी दर्शविली.पोलिसांच्या मध्यस्थीने अखेर कुसुम वैद्य या टॉवरवरून खाली उतरल्या. त्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये ठाणेदार ओमप्रकाश सोनटक्के यांच्या उपस्थितीत सनफ्लॅग कंपनीच्या व्यवस्थापनासोबत बैठक घेण्यात आली. यावेळी कंपनी व्यवस्थापकांना पाणी प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. उपविभागीय अधिकाऱ्यांनी येत्या दोन महिन्यांत कायमस्वरूपी उपाययोजना करून पाणी प्रश्न निकाली काढण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर मनसेच्या आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# अधिक मासामुळे विवाहसोहळ्यांना महिनाभर विराम जावयांची मात्र ‘चांदी’ ,व्यावसायिकांवर आर्थिक फटका

दैनिक वादळ वार्ता
**तळोधी (बा.) । वार्ताहर**

वैशाखाच्या उन्हात गावोगावी मंगलध्वनी घुमत असतानाच आता अधिक मासाच्या आगमनाने विवाहसोहळ्यांच्या गजबजाटाला महिनाभराचा विराम लागणार आहे. यंदा १५ मेपासून सुरू होणारा अधिक मास १५ जूनपर्यंत राहणार असून, हिंदू धर्मपरंपरेनुसार या काळात विवाह, वास्तुशांती, गृहप्रवेश यांसारखी शुभकार्ये टाळली जातात. ग्रामीण भागात ‘धोंड्याचा महिना’ किंवा ‘पुरुषोत्तम मास’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कालखंडात भक्ती, व्रत-वैकल्ये आणि धार्मिक साधनेला विशेष महत्त्व दिले जाते. गेल्या काही महिन्यांपासून ग्रामीण भागात लग्नसराईची धामधूम सुरू होती. मंगल कार्यालये उजळून निघाली होती, बँड-डीजेच्या तालावर वराती रंगत होत्या, तर आचारी, कॅटर्स, फुलवाले, मेहंदी कलाकार, छायाचित्रकार यांच्याही व्यवसायाला मोठी चालना मिळत होती. मात्र अधिक मास सुरू होताच या सर्व गजबजाटावर अचानक शांततेची चादर पसरल्याचे चित्र दिसणार आहे. विशेषतः उन्हाळ्यातील विवाहहंगामातच हा खंड पडत असल्याने अनेक व्यावसायिक आर्थिक चिंतेत सापडले आहेत.

१४ मेपर्यंत लग्नसमारंभांची लगबग कायम राहणार असून, त्यानंतर महिनाभर मंगलकार्यांवर विराम असेल. अधिक मासानंतर पावसाळ्याची चाहूल लागते आणि शेतीकामांनाही वेग येतो. त्यामुळे शेतकरी वर्ग अधिक मासापूर्वीच विवाह उरकण्यावर भर देताना दिसत आहे. यावर्षी सामूहिक विवाह सोहळ्यांचे प्रमाण तुलनेने कमी दिसून आले असून, शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत विवाह समारंभ अधिक थाटामाटात करण्याची जणू स्पर्धाच लागल्याचे चित्र आहे. सजावट, खानपान, वधू-वरांचे पोशाख आणि डीजेच्या जल्लोषावर लाखो रुपयांची उधळण होत असल्याचेही दिसून येत आहे.दरम्यान, शुभकार्यांना जरी विराम मिळत असला तरी नव्या जावयांसाठी हा महिना मात्र विशेष मानला जातो. अधिक मासात जावयाला सासरी बोलावून सन्मान करण्याची परंपरा आजही ग्रामीण संस्कृतीत जिवंत आहे. नव्या कपड्यांचे आहेर, चांदी-सोन्याच्या भेटवस्तू, अनारसे, धोंडे आणि प्रेमाने वाढलेले जेवण यामुळे जावयांची अक्षरशः ‘चांदी’ होत असल्याचे बोलले जाते. परंपरा, श्रद्धा आणि कौटुंबिक जिव्हाळा जपणारा हा अधिक मास गावाकडच्या संस्कृतीचे वेगळेपण अधोरेखित करताना दिसतो.

# शाळांमधील सोयी-सुविधांची जबाबदारी आता ग्रामसेवकांवर

दैनिक वादळ वार्ता
**नागपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा आणि परिसर स्वच्छता या सुविधा सुनिश्चित करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी (सीईओ) अधिकारी पी.एम. मिन्नू यांनी थेट ग्रामसेवकांवर सोपविली. या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ग्रामसेवक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला.

ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता, स्वच्छतागृहांची अपुरी व्यवस्था, थकीत वीजबिले आणि परिसरातील अस्वच्छता या समस्या वारंवार समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर मिन्नू यांनी ग्रामविकास अधिकारी तथा ग्रामसेवकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक शाळेची नियमित पाहणी करून आवश्यक सुविधा तातडीने

उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. या कामांसाठी ग्रामपंचायतीच्या निधीचा प्राधान्याने वापर करण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले. शाळांची वीजबिले नियमित भरणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेशी संबंधित कामांना प्राधान्य देणे तसेच शाळा परिसर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवणे यासाठी ग्रामपंचायतींनी सक्रिय भूमिका बजवावी, असे आदेशात नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढावी, शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण सुविधा मिळाव्यात, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. शाळांच्या विकासात कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसून सर्व संबंधित यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे, असेही सीईओंनी म्हटले.

# खरात प्रकरणातून सुटका करण्यासाठी करोडोंची रक्कम?

## आर्थिक रॅकेट कोण चालवतंय?-रोहित पवारांच्या आरोपांनी राज्यात खळबळ

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांचे लैंगिक शोषण आणि भक्तांच्या धार्मिक श्रद्धेचा गैरफायदा घेऊन त्यांच्याकडून लुटलेले पैशांच्या प्रकरणात नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात सध्या विविध गुन्ह्यांखाली पोलिसांच्या ताब्यात आहे.या प्रकरणात अनेक राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस दलातील अधिकारी, प्रशासनातील बडे चेहरे सहभागी असल्याची शक्यता पहिल्यापासूनच बोलून दाखवली जात आहे. परंतु या प्रकरणात नाव बाहेर येऊ नये, यासाठी आर्थिक रॅकेट चालवले जात असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादीचे नेते, आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांच्या आरोपांनी राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.अशोक खरात याच्या नाशिकच्या मिरगावातील काळ्या कृत्यांनी संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. श्रीमंत भक्तांना भुलवून त्यांच्याकडून लाखो रूपये उकळून, शेकडो महिलांचे लैंगिक शोषण करण्याचा कारनामे त्याने केले. त्याच्याच कार्यालयात काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने हा संपूर्ण प्रकार उघडकीस





आणला. याच प्रकरणात गेल्या दीड-दोन महिन्यांपासून अशोक खरात तुरूंगात आहे. विशेष पोलीस पथकाकडून त्याची चौकशी सुरू आहे. अशोक खरात याच्या दरबारात राजकारणी, प्रशासनातील बडे अधिकारी, उद्योजक असे समाजातील प्रतिष्ठित लोक जात असल्याचे समोर आले. यांच्यातीलच काही लोक या प्रकरणात आपले नाव येऊ नये यासाठी पैशांचा व्यवहार करीत असल्याचे रोहित पवार म्हणाले.रोहित पवार काय म्हणाले?भोंदू अशोक खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले असून त्या प्रकरणातील एक टक्के सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत . यामध्ये अनेक मोठे मासे देखील असून महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे. या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत असल्याची माहिती समजत आहे.मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात आहे. ज्यांना या प्रकरणातून बाहेर काढायचे आहे त्यांना भोंदू विरोधात फसवणूक केल्याची तक्रार करायला सांगितले जाते आणि या प्रकरणातून बाहेर काढले जाते अशी ही पद्धत असल्याची माहिती आहे, असे गंभीर आरोप रोहित पवार यांनी केले. रोहित पवार यांच्या आरोपांनी राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.योग्य कारवाई करून सत्य समोर आणावेमी केलेल्या आरोपांची किंबहुना माहितीची शहानिशा करून मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योग्य ती कारवाई करून या प्रकरणातील सत्य समोर आणावे, अशी विनंती रोहित पवार यांनी केली आहे.

# तू स्वतः मर,नाहीतर कुटुंबाला मारू!

## प्रेयसीच्या नातेवाईकांच्या छळाने तरुणाने जीवनयात्रा संपली

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

प्रेमप्रकरणामुळे सतत येणाऱ्या धमक्या आणि मानसिक छळाला कंटाळून तालुक्यातील मोरवड येथील तेजस दिलीप घोडके (२५) या तरुणाने गळफास घेऊन शुक्रवारी रात्री आपली जीवनयात्रा संपवली.आत्महत्येपूर्वी त्याने लिहिलेल्या सुसाईड नोटमुळे या घटनेमागील रहस्य उलगडले. याप्रकरणी रेणापूर पोलिसांत सात जणांविरुद्ध शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील मोरवड येथील तेजस दिलीप घोडके याचे गावात किराणा दुकान आहे. तो दुकान आणि शेती करीत असे. काही महिन्यांपूर्वी त्याचे एका मुलीशी प्रेमसंबंध होते. दरम्यान, ते पळून गेले होते. ती मुलगी अल्पवयीन असल्याने तेजसवर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात झाला होता. त्यामुळे तो कारागृहात होता. त्याची नुकतीच जामिनावर सुटका झाल्याने तो पुन्हा गावात आला होता. दरम्यान, जामिनावर बाहेर आल्यानंतर तेजसला मुलीच्या नातेवाइकांकडून सोशल मीडियाच्या माध्यमातून सतत धमक्या येत होत्या. तू स्वतः मर, नाहीतर तुझ्या वडिलांना, भावाला आणि चुलत्याला मारून टाकू, अशा आशयाचे संदेश त्याला पाठवले जात होते. मानसिक त्रासामुळे तो प्रचंड तणावाखाली होता.


मयत तेजस दिलीप घोडके

शुक्रवारी रात्री ७:३० ते ८ वा. च्या सुमारास तेजसने मोरवड शिवारात गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक सुसाईड नोट लिहिली आणि ती आपल्या चुलत भावाच्या व्हॉट्सपवर पाठवली. 'मी माझ्या स्वतःच्या मर्जीने नाही, तर गावातील शिवाजी मोहिते, रोहन काळे, नागेश गंगणे, अशोक गंगणे, पवन मोहिते, किंचक घोडके, रंजना घोडके यांच्या धमक्यांना कंटाळून आत्महत्या करत आहे, असे चिठ्ठीत म्हटले आहे. याप्रकरणी मयत तेजसचे वडील दिलीप घोडके यांच्या फिर्यादीवरून रेणापूर पोलिसांत वरील सात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

# बहिणीच्या प्रेमविवाहाचा राग; मेहुण्यावर भरदिवसा जीवघेणा हल्ला

## उल्हासनगर हादरले; सीसीटीव्हीत कैद झालेल्या रक्तरंजित प्रकारानंतर दोन आरोपी अटकेत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरजातीय विवाहाच्या रागातून सख्ख्या बहिणीच्या पतीवर भरदिवसा जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उल्हासनगरमध्ये उघडकीस आली आहे. कॅम्प क्रमांक ५ परिसरातील एका पेट्रोल पंपावर घडलेल्या या थरारक प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून जातीय अहंकारातून उफाळलेल्या द्वेषाचे भयावह चित्र समोर आले आहे.या प्रकरणी मुख्य आरोपी शकील खान आणि त्याचा साथीदार अरबाज खान यांना हिललाईन पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली आहे. दरम्यान, हल्ल्याची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागेश चव्हाण हा युवक नेहमीप्रमाणे पेट्रोल पंपावरील काम आटोपून घरी जाण्याच्या तयारीत होता. त्याच वेळी मोटारसायकलवरून आलेल्या दोन तरुणांनी त्याला गाठले. आरोपी शकील खानने कमरेला लपवून ठेवलेला धारदार चाकू बाहेर काढत कोणतीही पूर्वसूचना न देता नागेशवर सपासप वार करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे नागेशला बचावाची संधीही मिळाली नाही. गंभीर जखमी अवस्थेत तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.घटनास्थळी उपस्थित



नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेत नागेशला उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्याला मुंबई येथे हलविले आहे.घटनेची माहिती मिळताच हिललाईन पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. परिसरातील सीउढत फुटेज तपासून आरोपींचा माग काढण्यात आला आणि काही तासांतच शकील खान व अरबाज खान या दोघांनाही अटक करण्यात आली. पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे आरोपींना पसार होण्याची संधी मिळाली नाही.प्राथमिक चौकशीत आरोपी शकील खानने गुन्ह्याची कबुली दिली असून हल्ल्यामागचे कारणही स्पष्ट केले आहे. त्याची सख्खी बहीण नागेश चव्हाण याच्यासोबत आनंदाने राहत असतानाही आंतरजातीय विवाहाचा राग शकीलच्या मनात कायम होता. कुटुंबाच्या ‘मानहानी’ची भावना मनात ठेवून त्याने सूड उगवण्याचा कट रचल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला असून आरोपींना न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे सामाजिक सलोखा, जातीय मानसिकता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य याविषयी पुन्हा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. हिललाईन पोलीस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करीत आहेत.

# उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या पुढाकाराने महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

## लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल-डॉ.नीलम गोऱ्हे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात येणार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पुण्यातील महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानभवनात आढावा घेण्यात आला. पुनर्वसनाची प्रक्रिया राबविताना स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्यात यावे, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समिती, पुणे यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष व ऑनलाईन बैठक पार पडली. या बैठकीत रहिवाशांच्या पुनर्वसन, मोबदला, फ्लॅट वाटप आणि सर्वेक्षणासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इतर महानगरपालिकांमध्ये देण्यात आलेल्या मोबदल्याचा अभ्यास करण्यात यावा, असे निर्देश दिले. महानगरपालिका किती जागा सामावून घेऊ शकते याचाही अभ्यास करण्यात यावा. ज्या महानगरपालिकांमध्ये जितका मोबदला देण्यात आला आहे त्याचाही अभ्यास करण्यात येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना १५ तारखेला विशेष बैठक घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. संबंधित रहिवाशांसमोर धोरण मांडण्यात यावे, त्यांना आवाहन करण्यात यावे आणि त्यांचा विश्वास संपादन करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.पुनर्वसन प्रक्रियेत पारदर्शकता आणि लोकाभिमुख भूमिका महत्त्वाची असून ज्यांना रोख रक्कम हवी आहे त्यांना रोख मोबदला आणि ज्यांना फ्लॅट हवा आहे त्यांना फ्लॅट देण्याचा पर्याय विचारात घेण्यात यावा. सर्व स्मारकांचे सर्वेक्षण करून संपूर्ण तपशील लोकांसमोर मांडण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

कृती समितीच्या सदस्यांना स्थायी समिती सदस्यांकडे निवेदन सादर करून आपले मत अधिकृतपणे नोंदविण्याचाही सल्ला डॉ. गोऱ्हे यांनी दिला. त्यामुळे किती लोक घर स्वीकारण्यास तयार आहेत आणि किती लोकांना रोख रक्कम हवी आहे याची स्पष्ट माहिती उपलब्ध होईल. बैठकीपूर्वी लोकांचे मत जाणून घेतले तर ते उपयोगी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.बैठकीत पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त सपकाळ यांनी सर्व संबंधितांची स्वतंत्र बैठक घेऊन वन-टू-वन संवाद साधण्यात यावा. त्यानंतर लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात यावी, असे निर्देश डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

तसेच महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या पुनर्वसनाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.बैठकीस पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, उपायुक्त सपकाळ, नगर विकास विभाग २ च्या उपसचिव प्रियंका छापवाले, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे, समितीचे सदस्य विशाल मोहिते, अमर नाईक, अविनाश देवकुळे, श्रीनिवास गोणे, नरेंद्र कच्चावे यांच्यासह इतर सदस्य ऑनलाईन उपस्थित होते.



# पोलिस पाटील संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी कदम यांची निवड

## सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील धर्माळा या गावातील अतिशय शांत सयमी स्वभावाचे कृष्णा अशोक कदम यांची पोलिस पाटील संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाली आहे.या बाबतीत सविस्तर व्रत असे की ११.०५.२०२६ रोजी धर्माळा गावचे कृष्णा कदम यांची पोलिस पाटील संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली असून,ही निवड पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष दीपक पालीवाल यांच्या आदेशाने झाली आहे. कृष्णा कदम यांच्या निवडीमुळे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



# केज बस स्थानकातून २० हजाराचे दागिने लंपास,केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील नातेवाईकाचे लग्न पुणे येथे असल्यामुळे शनिवारी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान रूक्मीनबाई बाबुराव बारहाते रा.लोणगाव तालुका माजलगाव या केज बस स्थानकावर बसमधून उतरल्या होत्या व केज बस स्थानकात त्यांना घेऊन जाण्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांची त्या वाट बघत बसल्या असतानाच,त्यांच्या पिशवीत ठेवलेले ८ ग्रॅम सोन्याचे मनी मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी मंगळवार दि.१२ मे रोजी दुपारी केज पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. माजलगाव तालुक्यातील लोणगावयेथील रुक्मिणी बाबुराव बारहाते या त्यांच्या बोबडेवाडी येथील नातेवाईकाचे रविवार दि.१० मे रोजी पुणे येथे शुभविवाह असल्यामुळे त्या शनिवारी बोबडेवाडी येथील पाहुण्याकडे जाणार होत्या.शनिवार दि.९ मे रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या दरम्यान त्या केज बस स्थानकावर आल्या होत्या व त्या ठिकाणी त्यांना घेऊन जायला येणाऱ्या पाहुण्यांची त्या वाट बघत असतानाच त्यांच्याजवळ दोन-तीन अज्ञात महिला आल्या व त्यांनी त्यांना असे




सांगितले की,आत्ताच या ठिकाणी बस स्थानका तून काही महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या दागिण्याची चोरी झाली आहे.तुम्ही तुमच्या गळ्यातील दागिने काढून पिशवीत ठेवा.असे म्हणताच भोळ्या भाबड्या महिलेने आपल्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र काढून पिशवीत ठेवले. आणि याच्यावर पाळत ठेवून २० हजार ८०० रुपयाचे दागिने अज्ञात महिलांनी लांबविले.ही घटना समजल्यानंतर रुक्मिणी बाराहते यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात मंगळवारी सायंकाळी गुन्हा नोंद झाला असून पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली सहाय्यकफौजदार राजू वाघमारे ही पुढील तपास करीत आहेत.

# कोकाटे हादगाव छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे उत्स्फूर्तपणे प्रतिसाद!

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी | प्रतिनिधी**

नागरिकांच्या महसुली व प्रशासकीय समस्या गावपातळीवरच सोडवण्यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर या अभियानाची सुरुवात जालना जिल्ह्यात करण्यात आली. असून मंगळवार (तारीख १२ रोजी) कोकाटे हदगाव गाव परतुर येथील राबविण्यात आलेला या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिराच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या विविध सेवा व योजनेचा लाभ पोहोचण्याचा अधिकार उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा परिसरात शिबिराचे आयोजन करण्यात आली होती शिबिराचे उद्घाटक माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते झाले याप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपजिल्हाधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार दामोधर जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी रामराव रोडगे, गटविकास अधिकारी राजेश तांगडे,तालुका कृषी अधिकारी देवानंद सांगवे यांची उपस्थिती होती.



यावेळी विविध खात्यामार्फत राबविण्यात आलेल्या सेवांचा लाभार्थी लाभ घेतला. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार लोणीकर म्हणाली की महसूल विभागासह विविध शासकीय विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या प्रलंबित महसुली प्रकरणावर तात्काळ कारवाई करून शक्य तितक्या समस्या शिबिर स्थळीच निकाली काढाव्यात असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपजिल्हाधिकारी पद्माकर गायकवाड, दामोधर जाधव, रामराव रोकडे, यांनी मार्गदर्शन केले.

जमीन नोंदी, फेरफार, वारसा नोंद, संविधानाची प्रतिमा, उत्पन्न व जातीचे दाखले, तसेच विविध शासकीय योजनेची माहिती आणि लाभ या संदर्भातील प्रश्नाचे निराकरण प्राधान्याने करण्यात यावे.

शिबिरादरम्यान सातबारा अभिलेख वरील दुरुस्ती, प्रलंबित फेरफार नोंद दुरुस्ती, लोकसेवा हक्क अधिनियम अधिनियम अंतर्गत प्रमाणपत्रे डिजिटल सातबारा मोजणी फेरफार पी एम किसान, ग्री स्टॅग तक्रार निवारण भूसंपादन व कृषीत जमीन चे प्रकरणे तुकडेबंदी तसेच अकर्षित परवाने संदर्भातील नोंदी अद्यावत करणे या विविध कामे करण्यात येणार असल्याची शिबिर प्रसंगी नियोजन झाले. नायक तहसीलदार लक्ष्मीकांत खळीकर, सुंदरराव काळे,

मंडळ अधिकारी तेजश्री माळी, राष्ट्रपाल कांबळे, सभापती शत्रुघन कणसे, गजानन लोणीकर, संपत टकले, सरपंच नागेश ढवळे, प्रदीप ढवळे, विलास गोरे, यांच्यासह सर्कलमधील हजारो नागरिक यावेळी उपस्थित होते.

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १०६७ प्रकरणे यशस्वीपणे निकाली

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्षा समृध्दी भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये १०६७ प्रकरणे यशस्वीपणे निकाली काढण्यात आली.

९ मे रोजी चंद्रपूर जिल्हा न्यायालय व सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या अदालतीमध्ये प्रलंबित न्यायालयीन १२६९४ प्रकरणे, ११७४३ दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांपैकी ९०७ प्रकरणे तर दाखलपूर्व प्रकरणांपैकी १६० अशी एकूण १०६७ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यात मोटार अपघात वाहन प्रकरणे २२ निकाली काढण्यात आली असून नुकसान भरपाईची १कोटी ८६ लक्ष ३५ हजार



रुपये रक्कम मंजूर करण्यात आली. दाखलपूर्व प्रकरणामध्ये ५१ लक्ष ३० हजार ९४५ रुपये वसूल करण्यात आले. तसेच धनादेश अनादरीत झालेला प्रकरणापैकी ७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात लोक अदालत यशस्वी होण्यासाठी सर्व न्यायाधीश, सर्व वकील, सर्व न्यायालयीन कर्मचारी, पोलिस कर्मचारी यांनी सहकार्य केले, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एस. एस इंगळे यांनी दिली.

# शेवडी (बा) येथील गिरजाबाई देवरावआप्पा चपटे यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | प्रतिनिधी**

गिरजाबाई देवरावआप्पा चपटे यांचे मंगळवार दिनांक १२ मे २०२६ रोजी पहाटे ३:०० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्या शेवडी (बा), ता. लोहा, जि. नांदेड येथील रहिवासी होत्या. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्यावर त्याच दिवशी दुपारी ४:०० वाजता विरशैव-लिंगायत स्मशानभूमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस नातेवाईक, गावकरी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात तीन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे चपटे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून सर्वत्र शोक व्यक्त करण्यात येत आहे.

*शोकाकुल : समस्त चपटे परिवार, शेवडी (बा), ता. लोहा, जि. नांदेड



# राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत घुले शुभांगी सुरेश हिला कांस्यपदक

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.घुले शुभांगी सुरेश हिला कांस्यपदक मिळाले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाला कांस्यपदक प्राप्त झाले. कांस्यपदक प्राप्त विद्यार्थ्यांनी कु.घुले शुभांगी सुरेश हिचा सत्कार बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी प्राचार्य डॉ.कविता गित्ते-कराड मॅडम,संस्थेचे उपाध्यक्ष राजेश कापसे सर,तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077